# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३-विवि/ **५९**/२०२०
दिनांक : २७.०४.२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : कोरोनाव्हायरस च्या प्रादुर्भावामुळे आपत्कालिन स्थिती निर्माण झाली असून अशा अवस्थेमध्ये विद्यार्थ्यांचे मानसिक स्थैर्य देवून मनोबल वाढविण्याच्या दृष्टिकोनातून कौशल्य विकास चे ऑनलाइन धडे देण्याबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कोव्हिड १९ कोरोना व्हायरस च्या प्रादुर्भावामुळे आपत्कलिन स्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीमध्ये सर्व विद्यार्थी संभ्रमावस्थेत अडकले आहेत तेव्हा त्यांना मानसिक स्थैर्य देऊन, मनोबल वाढविण्याच्या दृष्टिकोनातून तसेच पुढील आयुष्यात मार्गदर्शनपर असे कौशल्य विकास अर्थात सॉफ्ट स्किल चे ऑनलाईन धडे विद्यार्थी विकास विभागातर्फे व कौशल्य विकास योजनाचे विद्यापीठाचे अधिकृत प्रशिक्षकांद्वारे देण्यात यावे असे मा.कुलगुरु महोदयांनी आदेश दिले आहेत.

सदर व्हिडीओ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या कौशल्य विकास योजना तज्ञ प्रशिक्षकांद्वारे योजनेच्या अभ्यासक्रमावर या उपक्रमाअंतर्गत तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये संवाद तंत्र, मुलाखत तंत्र, गटचर्चा, स्वपरिचय, पत्रलेखन, सादरीकरण तंत्र, वेळेचे व्यवस्थापन, ध्येयनिश्चिती, स्वप्रेरणा, नैतिकता व चारित्र्य इ. कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमाचा समावेश आहे.

लॉकडाऊच्या काळामध्ये आपल्या महाविद्यालयातील/विभागातील सर्व प्राध्यपक, विद्यार्थी विकास अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांचेमार्फत सदर उपक्रमाची माहिती व विद्यापीठाचे संकेत स्थळवर प्रसिध्द करण्यात आलेली लिंक पोहचविण्यात यावी. तसेच ही लिंक आपल्या संबंधित सर्व सोशल मिडियाद्वारे प्रसारीत करण्यात यावी, ही विनंती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संकेतस्थळवरील Corona Impact: Important Notices & Circulars या Tab मधील Online Soft Skill Development Workshop ला Click करुन Google Form द्वारे रजिस्ट्रेशन करुन सर्व व्हिडिओ आपणांस उपलब्ध होईल.

आपला विश्वासु,

**(डॉ.दिनेशकुमार सातंगे)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी :
१) मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२) कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.